

# नळ स्टॉपच्या चौकात 'अर्धा तास'

मित्राला यायला अर्धा तास उशीर होणार होता. भेटायचं ठिकाण होतं 'नळ स्टॉप' चौक. संध्याकाळी ६ ची वेळ. कुठेतरी चहा-कॉफी पीत वेळ काढण्यापेक्षा समोरचा 'टाईमपास' मला जास्त आकर्षित करीत होता. नळ स्टॉपचा चौक - संध्याकाळी गर्दीची वेळ आणि वाहतूक पोलिसांचे नेहमीपेक्षा जास्तच Active (?) पथक, असं गमतीशीर कॉकटेल नक्कीच माझी अर्धा तास करमणूक करेल, हे मी मनोमन ताडलं.

**महेश नारके**

वेळ ऑफिस सुटण्याची असूनही प्रत्येक जण घाईत होता. म्हणूनच सिग्नल नावाच्या (जणू काही) जोखडाला बांधल्यासारखा प्रत्येक जण पुढे जाण्यासाठी हिसका मारीत होता. काहींना मागे गर्दीत उभे राहून 'हरवण्यापेक्षा' सर्वांना दिसेल आणि सर्व दिसेल अशा ठिकाणी, सर्वांत पुढे असण्याचा आनंद उपभोगायचा असल्यामुळे Zebra Crossing चा शब्दशः आणि सोयीस्कर अर्थ लावून त्यावरच ते उभे (कारण पुण्यात कुठे आलेत नशलीर मग त्यांच्या Crossing चा प्रश्नच येतो कुठे?)

वाहतूक पोलिसांचं पथक मोठ्या साहेबांची करडी नजर सोसत समोरच्या वाहतुकीवर बारकाईने लक्ष ठेवून होतं. पुणं हे खऱ्या अर्थाने प्रगतीच्या एका टप्प्यावर पोचल्याचा नमुना पाहावयाचा असेल तर 'नळ स्टॉप'वर या. नुसतं समोर असलेल्या गाड्यांच्या व्हरायटी आणि त्या चालवणाऱ्यांच्या त्याहून छप्परतोड व्हरायटी बघून पुण्याला 'मेट्रो'ची अधिकृत उपाधी मिळायला काहीच हरकत नाही. पीएमटीच्या डुगडुग्या बसबरोबर व्होल्व्होला स्पर्धा करताना पाहून गंमत तर वाटतच होती; परंतु त्याच वेळी खचाखच भरलेली बस आणि

(पान ६ पाहा)

सकाळ प्रतिबिंब

विश्वासाचं... विस्ताराचं...

शनिवार ३० एप्रिल २००५

कर्वे रस्ता, कोथरूड, औंध परिसर

## 'अर्धा तास'

(पान १ वरून)

मोजक्या लोकांसाठीची आलिशान गाडी वेळेची, पैशाची आणि एकंदरीतच 'गरज तशी सेवा' हे तफावतीचं 'कमर्शियल' तत्त्व अधोरेखित करत होती. सायकलवाले दुचाकीवाल्यांना, दुचाकीवाले चारचाकीवाल्यांना आणि बसवाले सर्वांनाच 'एक आँख नहीं भाते' अशी रस्त्यावरची परिस्थिती.

सायकलस्वार प्रत्येक इंच स्वकष्टाने पार करतो, त्यामुळे त्याची अपेक्षा सहानुभूतीची, दुचाकीस्वार 'पन्नास हजारांची गाडी रस्त्यावर थांबते म्हणजे काय?' म्हणून सदैव गतिशीलतेची अपेक्षा, चारचाकीवाला माझ्या गाडीला 'अंश्रश्र श्रळपश लश्रशरी का नाही म्हणून वैतागलेला.

एव्हाना एक चुकार पांथस्थ ट्रॅपमध्ये अडकला, "साहेब, यांनी लिफ्ट मागितली, चक्कर आल्यासारखे करीत होते, माणुसकी म्हणून घेतलं. यांना मी ओळखतसुद्धा नाही," तेव्हा तिसऱ्याला, 'रुप्या, तुला सांगत होतो, मामा असतो या चौकात. ससससस ऐकलं नाही. भर आता. तोंड उघडायचं काही कारण होतं का?'

पोलिस मंडळी म्हणजे महाचतुर आणि सराईत. त्यामुळे बऱ्याच वेळा तुमची पटवापटवीची मात्रा लागूच होत नाही. मिसरूडही न फुटलेल्या कॉलेजकुमारांची आणखी दुसरीच गंमत. दहापैकी नऊ वेळा त्यांच्याकडे लायसेन्स नसते त्यामुळे असे 'चतकोर भेजेवाले' बकरे अलगद पोलिसांच्या तावडीत सापडतात.

एखाद्याच्या ओळखीचा जर कुणी उशरिोशपीं मध्ये असेल तर मात्र गोष्टी निराळी. मग पोलिसाच्यां कानाशी लागून हळू "आवाजात,आपले ते ...गायकवाड पोलिस माहीतच असतील..." पोलिस उलट मोठ्या आवाजात खेकसत, "अहो, शंभर गायकवाड आहेत. कुणाकुणाला ओळखणार?"

"नाय वो... पावती फाडा."

आता शेवटचा पर्याय म्हणून 'बकरा' मोबाईल लावतो. "काय कामाच्या वेळेला ताप हे... द्या इकडं ...कोण? आं... कोण श्रीपतराव का? आं... बोला मालक... कसं काय... म्हणलं बरेच दिवस गाटभेट नाय..." पलीकडचा बकरा आता 'सव्वा'शेर झालेला, हे परिवर्तन फक्त इथंच बरं का?

'ये दिल मांगे मोअर' अशा अवस्थेत मी असतानाच कंबख्त मित्र अवतरला आणि 'शो'चा 'दि एन्ड' झाला...

जाता जाता एक साधा विचार मनात तरळून गेला... नळ स्टॉपच्या चौकाचा रोज वापर करणाऱ्या उच्चभ्रू, बुद्धिवंत, थोडक्यात सांगायचं झालं तर 'जग पाहिलेल्या' वाटसरूंनी वाहतुकीच्या खोळंब्याची फक्त नाक मुरडून चर्चा करण्यापेक्षा 'उपाय' सुचविण्यासाठी पुढाकार घेतला तर...